**MHST200012752020**

## वि.दि.दा.क्र.२०९/२०२३ मधील निशाणी क्र.५१ वरील आदेश

प्रतिवादी क्र.२ याने सदरचा अर्ज नि.क्र.२३ वरील खर्चाची रक्कम ₹.५००/- जमा करुन घेवुन त्यांची कैफियत दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ चे असे म्हणणे आहे की, सदरचा दावा वादींनी तथाकथीत विसार पावतीच्या आधारे खरेदीपत्र करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर प्रतिवादीने नि.क्र.२३ सोबत कैफियत नाही आदेश रद्द होऊन अर्जासोबत दाखल केलेली कैफियत स्वीकारण्यासाठी अर्ज दिला होता. सदर अर्ज दि.१३.०६.२०१९ रोजी खर्चाची रक्कम रु.५००/- लादुन मंजुर करणेत आला. मात्र, अनावधानाने व नजरचुकीने सदर खर्च रक्कम रु.५००/- जमा करण्याचे राहुन गेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ याची कैफियत जमा दाखल करुन घेण्याचा आदेश झालेला नाही. दाव्याचे स्वरुप पाहता तसेच प्रतिवादींना वादीचे मागणीबाबत असलेल्या हरकती विचारात घेता प्रतिवादी क्र.२ ची कैफियत पटलावर दाखल होऊन त्यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याने अशी विनंती केली की, नि.क्र.२३ वरील कॉस्ट जमा करुन घेवुन कैफियत दाखल करुन घेण्यास परवानगी मिळावी.

३. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले की, प्रतिवादी याने अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तीक नाही. प्रतिवादीने निष्काळजीपणे व हयगयीमुळे पुर्तता केलेली नाही. सदरचा दावा जुना असुन वादीचा जबाब पुर्ण झालेला आहे. प्रतिवादी यांनी ७ वर्षानंतर दिलेला सदरचा अर्ज कायदेशीर नाही. सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादींवर अन्याय होणार आहे. सदरचा अर्ज दाव्याचे कामकाज लांबविणेच्या हेतुने दिलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रक्कम रु.५०००/- लादुन रद्द करणेत यावा.

४. अर्ज, लेखी म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

पटलावरुन असे दिसते की, प्रतिवादी क्र.२ याच्याविरुद्ध विना लेखी कैफियत सुनावणीचा आदेश पारीत करण्यात आला होता. सदर आदेश रद्द होऊन लेखी कैफियत स्वीकारण्यात यावे म्हणुन प्रतिवादी क्र.२ याने नि.क्र.२३ वर अर्ज दाखल केला होता. सदर नि.क्र.२३ वरील अर्ज न्यायालयाने दि.१३.०६.२०१९ रोजी रक्कम रु.५००/- दंडासह मंजुर केला. त्यानंतर वेळोवेळी संधी देवुन देखील प्रतिवादी क्र.२ याने सदर दंडाची रक्कम भरणा न केल्यामुळे आणि आदेशाची पुर्तता न केल्यामुळे माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२४.११.२०२२ रोजी नि.क्र.१ वरील आदेशान्वये सदर नि.क्र.२३ वरील आदेश रद्द केला आणि पुन्हा दावा प्रतिवादी क्र.२ च्या विरुद्ध विना लेखी कैफियत सुनावणीचा आदेश पारीत केला. असे असताना देखील प्रतिवादी क्र.२ याने पुन्हा नि.क्र.५१ वरील प्रस्तुत अर्ज दाखल करुन केवळ दंडाची रक्कम जमा करुन घेवुन लेखी कैफियत स्वीकारण्याची मागणी केली. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कायदयाने फेटाळण्यास पात्र दिसते. खरे पाहता, प्रतिवादी क्र.२ याने अभिलेखाचे अवलोकन करुन प्रकरणाचा लवकरात लवकर गुणतत्वावर निकाली काढण्याकामी सहकार्य करणे अभिप्रेत होते. परंतु उपरोक्त प्रतिवादी क्र.२ याचे कृत्य हे समर्थनीय दिसुन येत नाही. प्रकरण जुने झाले आहे. सबब, सर्व बाबी विचारात घेऊन पुढील आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१) अर्ज हा रक्कम रुपये २,०००/- (रक्कम रु.दोन हजार) दंडासह नामंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.२ याने वर नमुद दंडाची रक्कम वादींना दयावी.

SATISH BUGANNA GANAPA
Digitally signed by SATISH BUGANNA GANAPA
Date: 2026.07.07 17:21:36 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : ०७.०७.२०२६

(एस. बी. गणपा)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.